बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०३ । अंक – १८० –वा । वार सोमवार दि १३ एप्रिल २०२६ आरएनआय एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । पोस्टल नं. एल.एस.बी/बीड आर.एन.पी–२६६/२०२६–२०२८ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 180 MONDAY 13 April 2026 - RNI : MAHMAR/2023/83965 -Postal No. L S.B/Beed / RNP-266/2026-2028 Price - 3 Rupees Pages 4

# गेवराई तालुक्यातील गोदावरी लुटली जातेय आणि प्रशासन झोपलय का? तहसीलदार खोमणे नेमकं काय पाहत आहेत?

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४

## तहसीलदार संदिप खोमणे यांची बदली का होत नाही?

गेवराई तालुक्यातील कारभारावरून तहसीलदार संदिप खोमणे यांच्याविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, त्यांच्या बदलीची मागणी जोर धरत आहे. विविध प्रश्नांकडे होत असलेल्या कथित दुर्लक्षामुळे प्रशासनाविषयीचा विश्वास ढासळत चालल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. वारंवार तक्रारी करूनही काहीच बदल होत नसेल, तर अशा अधिकाऱ्यांना पदावर ठेवण्याचा फायदा काय? असा थेट सवाल नागरिक करत आहेत. दरम्यान, तालुक्यातील विविध समस्यांवर ठोस निर्णय न घेतल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचेही बोलले जात आहे. नागरिकांनी आता तहसीलदार संदिप खोमणे यांची तात्काळ बदली करून कर्तव्यदक्ष व जबाबदार अधिकारी नेमावा, अशी मागणी उचलून धरली आहे. कारवाईशिवाय परिस्थिती बदलणार नाही, असा इशारा देत नागरिकांनी प्रशासनाला आता तरी जागे होण्याचे आवाहन केले आहे.

## जिल्हाधिकारी साहेब, तहसीलदार संदिप खोमणेंना अजून किती दिवस त्याच ठिकाणी ठेवणार?

विविध प्रश्नांकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांचा रोष दिवसेंदिवस वाढत असून, अकार्यक्षम अधिकाऱ्यांविरोधात आता उघडपणे आवाज उठू लागला आहे. अशा तहसीलदारांना अजून किती दिवस त्याच ठिकाणी ठेवणार? असा थेट सवाल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना नागरिकांकडून विचारला जात आहे. प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांचा संयम सुटत चालल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान, गेवराई तालुक्याला कर्तव्यदक्ष, जबाबदार आणि जनतेच्या समस्या सोडवणारा तहसीलदार द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. कारभारात बदल झाला नाही, तर परिस्थिती आणखी बिघडेल, असा इशारा देत नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब, अकार्यक्षम तहसीलदार संदिप खोमणेंना अजून किती दिवस सांभाळणार गेवराईला कर्तव्यदक्ष तहसीलदार द्या!

### ▲ तहसीलदार संदिप खोमणे यांच्या दुर्लक्षामुळे कोट्यवधींचा महसूल बुडाला; जबाबदारी टाळून अजून किती दिवस बसणार?

**वाळू माफियांचा उच्छाद सुरूच; महसूल विभाग संगनमतात आहे का, की जाणीवपूर्वक डोळेझाक?**







गेवराई (आरंभ वृत्तसेवा):– गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात सध्या वाळू माफियांचा अक्षरशः नंगानाच सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. दिवसाढवळ्या अवैध वाळू उपसा आणि रात्रीच्या अंधारात सुरू असलेली मोठ्या प्रमाणातील वाहतूक यामुळे गोदावरीचे पात्र पूर्णपणे उध्वस्त झाले असून, नदीपात्राची चाळण करण्यात आल्याचे वास्तव नागरिकांच्या तोंडून समोर येत आहे. गेल्या काही काळापासून गोदावरी नदीकाठच्या विविध भागांत यंत्रांच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू आहे. नियमांचे उघड उल्लंघन करून जेसीबी, पोकलेनसारख्या यंत्रांचा वापर करण्यात येत असून, प्रशासनाच्या डोळ्यादेखत हा सर्व प्रकार सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. विशेष म्हणजे, याबाबत महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अवैध वाळू उपसा करून ट्रॅक्टर, डंपरच्या माध्यमातून वाहतूक सुरू असताना गेवराईचे तहसीलदार संदिप खोमणे यांना हा सर्व प्रकार दिसत नाही का? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. दररोज मोठ्या प्रमाणावर वाळूची चोरी होत असताना प्रशासन गप्प का? असा रोष व्यक्त करत महसूल विभागाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

या अवैध वाळू उपशामुळे शासनाच्या महसुलाला कोट्यवधी रुपयांचा फटका बसत असल्याचे बोलले जात आहे. लिलाव प्रक्रिया बाजूला सारून थेट नदीपात्रातून वाळू उचलली जात असल्याने सरकारी तिजोरीत जाणारा पैसा माफियांच्या खिशात जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

वाळू उपशामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असून नदीपात्राची नैसर्गिक रचना बिघडत चालली आहे. पाण्याची पातळी खालावत असून भविष्यात पिण्याच्या पाण्याची व शेतीची समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच पावसाळ्यात पूरस्थितीचा धोका वाढण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. पान २ वर...




# जयभीमनगर येथे १३५ व्या भीमजन्मोत्सवाला उत्साहात सुरूवात

### विविध प्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन



बीह (प्रतिनिधी) – जयभीमनगर, अंबाजोगाई येथे १३५ वा भीमजन्मोत्सव –२०२६ व १९९ व्या क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त शनिवारी पंचशील बुद्ध विहार, जयभीमनगर ते संघर्ष भूमी, अंबाजोगाई अशी समता बाईक रॅली काढून मोठ्या उत्साहाने सुरूवात झाली. जयभीमनगर, अंबाजोगाई येथील भीमजन्मोत्सव हा बाल मेळावा, महिला मेळावा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, विद्रोही कवी संमेलन, व्याख्यान,व भीमगीत गायन असे विविध बौद्धिक व समाज प्रबोधनाचे कार्यक्रम घेऊन साजरी केली जाते. त्यासाठी कसल्याही प्रकारची बाहेरील आर्थिक मदत न घेता, कोणालाही पैसे न मागता जे समाज बांधव स्वत:हून पान २ वर...

गायराण जमीनीचा बांध कोरल्याच्या कारणावरून झालेल्या भांडणातील

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना अवघ्या ६ तासात ठोकल्या बेड्या



बीड (आरंभ वृत्तसेवा):– हकीकत याप्रमाणे आहे की, फिर्यादी नामे पपेश उर्फ गुडडया अर्जुन माळी वय ३१ वर्षे व्यवसाय–शेती, रा. रामनगर तांडा ता. गेवराई जि.बीड याने दिनांक १२.०४.२०२६ रोजी पोलीस ठाणे गेवराई येथे येऊन फिर्याद दिली की, दिनांक ११.०४.२०२६ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजता च्या सुमारास फिर्यादीचे वडील मयत अर्जुन साहेबराव माळी हे गोंडगाव शिवारातील काढलेल्या व ताब्यात घेतलेल्या गायरान जमीनीकडे चक्कर मारण्यासाठी गेले होते. त्यावेळी झालेल्या भांडणात यातील फिर्यादीचे वडीलांना आरोपी नामे १) १) मधुकर नायबा शिंदे व २) मनोहर मधुकर शिंदे, ३) विधी संघर्षग्रस्त् बालक सर्व रा. मनगर तांडा, ता. गेवराई, जि. बीड यांनी मारहाण केल्याने अर्जुन माळी यांना खुप जबर मार लागला असल्याने प्राथमिक उपचार करुन गंभीर दुखापत असल्याने सरकारी दवाखाना बोड येथे पुढील उपचाराकरीता रेफर केले असता त्यांचा उपचार पान २ वर...

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी करा : पप्पू कागदे



बीड (आरंभ वृत्तसेवा):– भारतरत्न, भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि सामाजिक न्यायाचे महान प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती यंदा मोठ्या उत्साहात, एकोप्याने आणि समाजप्रबोधन करणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे साजरी करावी, असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.डॉ. आंबेडकर यांनी दिलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवरच भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी उभी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही केवळ जबाबदारी नसून एक सामाजिक बांधिलकी आहे, असेही त्यांनी नमूद केले. जयंती हा केवळ उत्सव किंवा परंपरा नसून त्यांच्या क्रांतिकारी विचारांचा प्रसार करण्याचा आणि समाजाला योग्य दिशा देण्याचा एक प्रभावी माध्यम आहे, असे कागदे यांनी स्पष्ट केले. यावेळी पान २ वर...

संपादकीय...

## इराणमध्ये लोकशाही प्रस्थापित करणे, ..

इराणमध्ये लोकशाही प्रस्थापित करणे, अण्वस्त्रांपासून रोखणे किंवा खामेनेई राजवट संपुष्टात आणणे ही युद्ध समर्थनासाठी दिली जाणारी कारणे प्रथमदर्शनी आकर्षक वाटतात; मात्र ती वरवरची आहेत. युद्धाशिवाय अमेरिकेला यापैकी अनेक उद्दिष्टे साध्य करता आली असती. उलट युद्धामुळे ही उद्दिष्टे अधिकच दुरावली. अमेरिकेला याची जाणीव पहिल्याच दिवशी झाली. सर्वोच्च नेत्याची हत्या झाल्यावर ज्या त्वेषाने इराण लढला, त्याच राष्ट्रीय भावनेने तो खामेनेई जिवंत असतानाही लढला असता. युद्धासाठी सैन्याला लागणारा मनोवैज्ञानिक आधार अमेरिकेने स्वतःच इराणला दिला. त्यामुळे नेतृत्वहीन वाटणारा इराण ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यावर काही अंशी वरचढ ठरला.

देश म्हणजे केवळ राजकीय रचना किंवा भूगोल नव्हे; तो इतिहासात तावून-सुलाखून निघालेला सांस्कृतिक आविष्कार असतो. देशाच्या सामर्थ्यात त्या सांस्कृतिक भावनेचा मोठा वाटा असतो. नेमके हे वास्तव अमेरिकेला आजवर उमगलेले नाही. प्रत्येक वेळी इतर देशांत हस्तक्षेप करायचा आणि त्यातून ना त्या देशाचे भले, ना जगाचे. पश्चिम आशियातील संघर्षाच्या मुळाशी हेच अमेरिकन वर्तन आहे. या युद्धातूनही अमेरिकेला धडा मिळेल, अशी शक्यता कमीच.

दुसरा मुद्दा म्हणजे अमेरिका-इस्रायल यांची तथाकथित 'नैसर्गिक' मैत्री. हिटलरने ज्यूंवर केलेले अत्याचार माणुसकीला कलंक होते, हे मान्यच; पण त्याच वेदनेचे भांडवल करून इस्रायलने पॅलेस्टाईनमध्ये आजवर जे केले, ते क्रौर्याचेच उदाहरण आहे. अमेरिकेच्या बहुतांश राष्ट्राध्यक्षांनी या धोरणाकडे दुर्लक्ष केले; पण इस्रायलला धोरणात्मक पाठिंबा देण्यावर अमेरिकेचे एकमत कायम राहिले. यातून इस्रायलला जणू विशेषाधिकार मिळाल्यासारखी स्थिती निर्माण झाली. युद्धविरामानंतरही लेबनॉनवरील हल्ले त्याचेच निदर्शक आहेत. इस्रायल हे अमेरिकेसाठी अवघड जागेचे दुखणे ठरले आहे. अमेरिकेचे इस्रायलवरील आंधळे प्रेम आणि इस्रायलचा बेमुर्वतखोरपणा यावर जोपर्यंत लगाम बसत नाही, तोपर्यंत पश्चिम आशिया धगधगतच राहील; आणि युद्धविराम हा वास्तवात अर्धविरामच ठरेल.

इस्रायलने हे युद्ध का लादले?

इराणने किंवा अन्य अरब राष्ट्रांनी अमेरिका हिताला साजेसे धोरण आखल्यास अमेरिका युद्ध लादण्याची शक्यता कमी आहे. अमेरिका-सौदी हे त्याचे उदाहरण. अमेरिकानिर्मित व्यवस्थेला इराण आव्हान देत आहे, हा अमेरिकेचा खरा राग. तर इस्रायलला प्रबळ प्रतिस्पर्धी नको आहे. स्वतःचे अस्तित्व अबाधित राखण्याच्या भावनेतून हे युद्ध इस्रायलने लादले आहे.

अमेरिकेने वेसण घातली असती तर..

इराण हे आपले शत्रूराष्ट्र आहे यात दोन्ही मित्रांमध्ये एकमत आहे, परंतु त्याला किती प्रमाणात सामोरे जावे याबाबतीत दोघांत मतभेद आहेत. डोनाल्ड ट्रम्प ही गुंतागुंत समजण्यास कमी पडले. बायडेन यांच्याप्रमाणे ट्रम्प यांना वेसण घालणे नेतन्याहू यांना शक्य न झाल्यामुळेच जगाला युद्धाचे हे मोठे परिणाम भोगावयास लागले.

इराणमध्ये लोकशाही प्रस्थापित करणे, अण्वस्त्रांपासून रोखणे किंवा खामेनेई राजवट संपुष्टात आणणे ही युद्ध समर्थनासाठी दिली जाणारी कारणे प्रथमदर्शनी आकर्षक वाटतात; मात्र ती वरवरची आहेत. युद्धाशिवाय अमेरिकेला यापैकी अनेक उद्दिष्टे साध्य करता आली असती. उलट युद्धामुळे ही उद्दिष्टे अधिकच दुरावली. अमेरिकेला याची जाणीव पहिल्याच दिवशी झाली. सर्वोच्च नेत्याची हत्या झाल्यावर ज्या त्वेषाने इराण लढला, त्याच राष्ट्रीय भावनेने तो खामेनेई जिवंत असतानाही लढला असता. युद्धासाठी सैन्याला लागणारा मनोवैज्ञानिक आधार अमेरिकेने स्वतःच इराणला दिला. त्यामुळे नेतृत्वहीन वाटणारा इराण ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यावर काही अंशी वरचढ ठरला.

देश म्हणजे केवळ राजकीय रचना किंवा भूगोल नव्हे; तो इतिहासात तावून-सुलाखून निघालेला सांस्कृतिक आविष्कार असतो. देशाच्या सामर्थ्यात त्या सांस्कृतिक भावनेचा मोठा वाटा असतो. नेमके हे वास्तव अमेरिकेला आजवर उमगलेले नाही. प्रत्येक वेळी इतर देशांत हस्तक्षेप करायचा आणि त्यातून ना त्या देशाचे भले, ना जगाचे. पश्चिम आशियातील संघर्षाच्या मुळाशी हेच अमेरिकन वर्तन आहे. या युद्धातूनही अमेरिकेला धडा मिळेल, अशी शक्यता कमीच.

दुसरा मुद्दा म्हणजे अमेरिका-इस्रायल यांची तथाकथित 'नैसर्गिक' मैत्री. हिटलरने ज्यूंवर केलेले अत्याचार माणुसकीला कलंक होते, हे मान्यच; पण त्याच वेदनेचे भांडवल करून इस्रायलने पॅलेस्टाईनमध्ये आजवर जे केले, ते क्रौर्याचेच उदाहरण आहे. अमेरिकेच्या बहुतांश राष्ट्राध्यक्षांनी या धोरणाकडे दुर्लक्ष केले; पण इस्रायलला धोरणात्मक पाठिंबा देण्यावर अमेरिकेचे एकमत कायम राहिले. यातून इस्रायलला जणू विशेषाधिकार मिळाल्यासारखी स्थिती निर्माण झाली. युद्धविरामानंतरही लेबनॉनवरील हल्ले त्याचेच निदर्शक आहेत. इस्रायल हे अमेरिकेसाठी अवघड जागेचे दुखणे ठरले आहे. अमेरिकेचे इस्रायलवरील आंधळे प्रेम आणि इस्रायलचा बेमुर्वतखोरपणा यावर जोपर्यंत लगाम बसत नाही, तोपर्यंत पश्चिम आशिया धगधगतच राहील; आणि युद्धविराम हा वास्तवात अर्धविरामच ठरेल.

इस्रायलने हे युद्ध का लादले?

# शेतकरी संघटनेच्या वतीने निवासी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

माजलगाव - शेतकरी संघटनेच्या वतीने १६,१७ आणि १८ एप्रिल २०२६ रोजी निवासी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन खेरडा (खु) ता.माजलगांव जि.बीड येथे केले आहे.शिबिराच्या ठिकाणी १०० शिबिरार्थींच्या मुक्कामाची व्यवस्था केलेली आहे. शेतकरी संघटनेचे विचार समजून घेण्यासाठी अवश्य यावे.असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष तथा भारतीय किसान संघ-परिसंघ नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांनी केले आहे. १६ एप्रिल २०२६ रोजी सर्जक स्वातंत्र्य संघटनेचे प्रमुख अमर हबीब हे सकाळी ११ वाजता. शिबिराचे उदघाटन करून मार्गदर्शन करतील. दुपारच्या जेवणानंतर शेतीमालाचा उत्पादन खर्च कसा काढावा? यासंबंधी माजलगावचे तालुका कृषी अधिकारी गणेश दाभाडे आणि गौरव बापमारे माहिती देतील. शेतीमालाचा रास्त भाव की हमीभाव? यासंबंधी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट मार्गदर्शन करतील.तर शेतकरी संघटनेच्या क्रांतीसिंह नाना पाटील ब्रिगेडचे अध्यक्ष नाना नांदखिले शेतमजुरांच्या समस्येवर आपले मनोगत व्यक्त करतील. प्रत्येक वक्त्यांचे भाषण झाल्यानंतर प्रश्नोत्तरे होतील.रात्रीच्या जेवणानंतर माजलगाव तालुक्यातील कवींचे शेतकरी कवी संमेलन होणार आहे.

१७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता शेती अभ्यासक इरफान शेख 'ग्रो प्रोडयूसर कंपन्यांची बाजार व्यवस्था' यावर आपले विचार मांडतील. कृषी मुल्य आयोगाचे माजी सदस्य अच्युत बापू गंगणे 'आम्हीच खरे उद्योजक ' यांवर भुमिका मांडणार आहेत. 'शेतकरी आंदोलनासमोरिल आव्हाने' याविषयी शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष, लक्ष्मण वडले आपले मनोगत मांडतील.दुपारच्या जेवणानंतर 'रावण राजा राक्षसांचा' या पुस्तकाचे प्रसिद्ध लेखक शरद तांदळे हे बळीराजा कोण होता? याची ऐतिहासिक संदर्भासह माहिती देतील. सततच्या कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील का? यावर किसान सभेचे ड .अजय बुरांडे शेतकरी कामगार पक्षाचे ड.नारायण गोले पाटील, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अजीमुद्दीन शेख, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे कुलदीप करपे यांच्यासह इतर शेतकरी कार्यकर्ते आपली मते मांडतील.रात्रीच्या जेवणानंतर अंबाजोगाईचे हेमंत धानोरकर यांचा अंधश्रध्दा निर्मूलनाचा कार्यक्रम होणार आहे. १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी औरंगाबाद उच्च न्यायालयातील वकील तथा शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ड.अजित काळे शेतकरी विरोधी कायदे याविषयी माहिती देतील. तसेच २०१७ च्या शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेतील सरकारच्या भुमिकेचे सविस्तर विवेचन करतील. शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा ऊस दर आंदोलनाचे सरसेनापती रघुनाथदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाने शिबिराचा समारोप होणार आहे.यावेळी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीमालाचा व्यापार करणारे नाशिकच्या सह्याद्री फार्मचे कार्यकारी संचालक विलास शिंदे निर्यातक्षम शेतीची माहिती देतील. तरी परिसरातील शेतकऱ्यांनी शिबीरात सहभागी व्हावे.असे आवाहन शेतकरी संघटनेच्या वतीने सतिश रिंगणे, महादेव गायकवाड, आण्णासाहेब मस्के,अनंत शिंदे, निलाराम टोळे आदिंनी केले आहे.

पान १ वरून..

### जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब, अकार्यक्षम तहसीलदार संदिप खोमणेंना अजून किती दिवस सांभाळणार गेवराईला कर्तव्यदक्ष तहसीलदार द्या!

या पार्श्वभूमीवर तहसीलदार संदिप खोमणे यांची तात्काळ बदली करून गेवराई तालुक्याला कर्तव्यदक्ष अधिकारी द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. जोपर्यंत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही, तोपर्यंत वाळू माफियांचा हा नंगानाच थांबणार नाही, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे दरम्यान, गोदावरीचे उध्वस्त होत चाललेले पात्र, बुडणारा महसूल आणि वाढता नागरिकांचा रोष या पार्श्वभूमीवर प्रशासन आता तरी जागे होणार का, की माफियांना मोकळे रान देणार, हा मोठा सवाल उपस्थित झाला आहे. गेवराई तालुक्यातील नागरिकांचे लक्ष आता प्रशासनाच्या कारवाईकडे लागले आहे.

----------------

### जयभीमनगर येथे १३५ व्या भीमजन्मोत्सवाला उत्साहात सुरूवात

स्वाभिमान निधी देतात त्यातूनच दरवर्षी भीमजन्मोत्सव साजरा केला जातो, ही गौरवाची व इतरांसमोर आदर्श निर्माण करणारी बाब आहे.

जयभीमनगर मधील भीम अनुयायी हे महामानवांची जयंती दरवर्षी विविध प्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन करून साजरी करतात. हे दरवर्षीच दिसून येते. त्यामुळे परिसरातील नागरिक हे प्रबोधनाच्या कार्यक्रमास पाचही दिवस मोठ्या संख्येने बौद्धिक व ऊर्जादायी म्हणून मोठ्या संख्येने हजर असतात. अशा प्रकारचा विविध कलागुणांना वाव देणारा भीमजन्मोत्सव - २०२६ च्या कार्यक्रमाची रूपरेषा पुढील प्रमाणे आहे. शनिवार, दि.११ एप्रिल रोजी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले जयंतीनिमित्त पंचशील बुद्ध विहार येथे अभिवादन व पंचशील बुद्ध विहार ते संघर्षभूमी समता रॅली काढण्यात आली, त्याच्या नियोजनाची जबाबदारी अध्यक्ष संजयकुमार शिंदे, उपाध्यक्ष भाऊसाहेब कांबळे व प्रकाश बापू सरवदे यांनी पार पाडली. मंगळवार, दि.१४ एप्रिल रोजी भीमजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष मोहनराव कांबळे व ज्येष्ठ आंबेडकरवादी विचारवंत ॲड.शाम (भाऊ) तांगडे यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर लगेचच अभिवादन व सामूहिक बुद्धवंदना लक्ष्मीबाई ज्ञानोबा रोकडे, आयु.दैवशाला ताई मधुकर खळगे, प्रतिभाताई सतीश बनसोडे व अनिताताई रोहिदास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. त्यानंतर सकाळी ठीक ११.३० वाजता प्रबोधनात्मक व्याख्यान होणार असून त्याच्या अध्यक्षस्थानी ॲड.शाम (भाऊ) तांगडे हे राहणार असून प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य अरूण पवार हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणादायी विचार या विषयावर व्याख्यान देणार आहेत. बुधवार, दि.१५ एप्रिल रोजी बाल मेळावा व महिला मेळावा तर दु १ वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. त्यामध्ये वेशभूषा, संगीत खुर्ची, गीतगायन, वक्तृत्व स्पर्धा व सायं.७ वाजता व्यक्त व्हा, मुक्त व्हा असा सर्वांसाठी खुला व्याख्यानाचा कार्यक्रम ठेवण्यात आलेला आहे, त्याची जबाबदारी कमिटी अध्यक्षा प्रतिभाताई सतीश बनसोडे, प्रमुख अतिथी म्हणून अनिताताई शिंदे राहणार आहेत. तर कमिटी अध्यक्षा सुनंदाताई भास्कर घाडगे, उपाध्यक्षा विद्याताई तुकाराम बुक्तर, सचिव प्रज्ञाताई दीपक वाघमारे व परीक्षक म्हणून सुप्रियाताई वसंत वाघमारे हे जबाबदारी पार पाडणार आहेत. गुरूवार, दि.१६ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता मुलांसाठी सामान्यज्ञान, रंगभरण व वक्तृत्व या स्पर्धा होणार असून त्याची जबाबदारी अध्यक्ष के.डी.सरवदे, उपाध्यक्ष धनराज वाहुळे, उपाध्यक्ष बी.एन.गायकवाड, तर परीक्षक म्हणून नितीन गायसमुद्रे, संजय पाडोळे, अमोल सोनवणे व समाधान धिवार हे राहणार आहेत. संध्याकाळी ७ वाजता विद्रोही कवी संमेलन होणार असून त्यामध्ये महाराष्ट्राच्या विविध भागातील नामवंत कवी संदेश शालिनी कर्डक, बबन सरवदे, सुमित गुणवंत, सुदेश जगताप, गजानन गावंडे हे सहभागी होणार आहेत. कवी संमेलनाची जबाबदारी कमिटी अध्यक्ष सुधाकर हातागळे, उपाध्यक्षा सुजाताताई भोजने, आशाताई वाघमारे व बाळासाहेब खांडके हे पाहणार आहेत. शुक्रवार, दि.१७ एप्रिल रोजी सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात येऊन सायं.८ वाजता महाराष्ट्रातील नामवंत शाहीर व सिनेअभिनेते चरणदादा जाधव, मुंबई यांचा आंबेडकरी शाहिरी जलसा सादर होणार आहे. शाहिरी जलसाची जबाबदारी कमिटी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.मधुकर खळगे, उपाध्यक्ष राजेश कांबळे,व दादाहरी कांबळे हे पाहणार आहेत. प्रबोधनपर कार्यक्रमास सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने हजर राहून आदर्शवत असा भीम जन्मोत्सव - २०२६ यशस्वी करावा, असे आवाहन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मोहनराव कांबळे, उपाध्यक्ष लक्ष्मण खरात, संजय चव्हाण, सचिव बाबुराव बनसोडे, सहसचिव बाळासाहेब खांडके, कोषाध्यक्ष सुधाकर हातागळे, सहकोषाध्यक्ष रघुनाथ सरवदे, सदस्य सुजाताताई भोजने,व विजयाताई धिवार व सल्लागार समितीचे सदस्य ॲड.शाम (भाऊ) तांगडे, ज्ञानोबा रोकडे, प्रा.पी.वाय.फुलवरे, अच्युतराव जोगदंड, अशोक ताटे, प्राचार्य डॉ.मधुकर खळगे, एम.एम.गायकवाड, अशोक सरोदे, सतीश दादा बनसोडे, प्रकाश बापू सरवदे, बाबासाहेब समुद्रे, राणोजी वैद्य, गौतम कांबळे, संजयकुमार शिंदे, दिलीप ढोबळे, मोहन वाघमारे, श्रीमंत हजारे, तुकाराम बुक्तर व डॉ.एम.एच.कांबळे हे करीत आहेत.

----------------

### भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात

त्यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, शैक्षणिक मार्गदर्शन, व्याख्याने, वाचन स्पर्धा, तसेच सामाजिक ऐक्य वाढविणारे विविध कार्यक्रम आयोजित करावेत. यामुळे जयंती उत्सवाला केवळ औपचारिकतेचे स्वरूप न राहता तो समाजपरिवर्तनाचा प्रेरणादायी उत्सव ठरेल. तसेच, जयंती उत्सव शांततेत, शिस्तबद्ध पद्धतीने आणि बंधुभाव जपत साजरा करण्याचे आवाहन पप्पू कागदे यांनी केले. समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करून सर्व घटकांना एकत्र आणण्याचे कार्य या जयंतीच्या माध्यमातून घडावे, हीच खरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन ठरेल, असेही त्यांनी शेवटी सांगितले.

-------------

### खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना अवघ्या ६ तासात ठोकल्या बेड्या

चालु असता डॉक्टरांनी ते मयत झाल्याचे सांगितले आहे. वगैरे मजकुराच्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे गेवराई येथे गुरनं. २१७/२०२६, कलम-१०३(१), ३५२, ३(५) भा.न्या. संहिता अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करून गुन्ह्याचा तपास सुरू करण्यात आला गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि. अण्णासाहेब पवार पोलीस ठाणे गेवराई हे करत आहेत. सदर घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकारी यांचे आदशान्वये गुन्ह्यातील फरार आरोपींचे शोधकामी वेगवेगळी पथके छत्रपती संभाजीनगर, जालना तसेच धाराशिव जिल्ह्यात रवाना करण्यात आली. आरोपी शोध दरम्यान गन्ह्यातील आरोपी हे त्यांचा मोबाईल बंद करून अज्ञात ठिकाणी गेल्याबाबतचे समजल्याने आरोपींचा गोपनिय पध्दतीने शोध घेत असतांना आरोपी १) मधुकर नायबा शिंदे व २) मनोहर मधुकर शिंदे हे बीड शहरातील बार्शीनाका परिसरात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने लागलीची गेवराई पोलीसांचे पथक बीड शहरात पोहचून आरोपी हे पळून जाण्याच्या प्रयत्नतात असतांना त्यांना अत्यंत शिताफीने ताब्यात घेऊन पोलीस ठाणे गेवराई येथे आणून दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदरची कारवाई केवळ सहा तासात पूर्ण करण्यात आली. सदर कामगीरी मा.नवीनत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, मा. सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीड, मा.अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधीकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर पवार, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे गेवराई यांनी योग्य नियोजन करून गुनह्याचे तपास अधिकारी सपोनि. अण्णासाहेब पवार, सपोनि.दीपक लंके, सपोनि. संतोष जंजाळ, पोउपनि. राम खोत, पोउपनि. संजय उदगीरकर, ग्रेपोउपनि. सुरेश पराधी, पोह/१३२७ रविंद्र राऊत, पोह/१३१७ चंद्रसेन माळी, पोह/९५४ आशोक हंबर्डे, पोह/२०२६ सुंदर राठोड, पोह/५३० गणेश घोलप, पोह/२२३ कल्याण राठोड, पोकॉ/२४१ गोरक्ष डोके, पोकॉ/२१०४ ओव्हाळ यांनी कामगीरी बजावली आहे.

----------------

पान ४ वरून..

### सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी रिपाइंचा ईद ए-मिलाफ

, दिपक कांबळे, प्रमोद दासूद, दशरथ सोनवणे, संदिपान डोंगरे, गौतम बचुटे, रवि जोगदंड, गोवर्धन वाघमारे, संतोष जाधव, बापू पवार, शाहू डोळस, जयदीप सवाई,मायाताई मिसळे, राणी गायकवाड, रेश्माताई जोगदंड, पठाण भाबी, शोभा गलांडे, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, अमोल धन्वे, सुभाष तांगडे, सतिश शिनगारे, दयानंद उजगरे, संभाजी गायकवाड, राहुल वाघमारे, राहुल सरवदे, अक्षय कोकाटे, भाऊसाहेब दळवी, ड. श्रीकांत साबळे,मनोज वाघमारे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, रतन वाघमारे, बंटी वडमारे, यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

ईद-ए- मिलाफचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू जोगदंड, मझरखान, किसन तांगडे, रमेश गंगाधरे, शेख रोहिल (नगरसेवक), मसूद खान (नगरसेवक) सिद्दीक फारोखी, सुलतान बाबा, रफिक भाई (फिटर) रणजीत शिनगारे, मुबीन जुबेरी, सादिक पठाण, शेख अजीम (मामू), फरहान बागवान आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड.सुरेश वडमारे यांनी केले.

------------------

### मराठवाडा विभागात शेकापक्ष विस्ताराची जबाबदारी आता केजचे भाई मोहन गुंड यांच्या खाद्यावर

करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी जनसंघटना आघाड्याची स्थापना करून त्यावर पदाधिकारी नेमण्याचे अधिकार ही भाई मोहन गुंड यांना देण्यात आले आहेत. केलेल्या कामाचा सविस्तर अहवाल वेळोवेळी मध्यवर्ती कार्यालयात पाठवण्याच्या सूचना ही देण्यात आल्या आहेत. या निवडीमुळे मराठवाड्यात शेतकरी कामगारांच्या प्रश्नांवर शेकाप अधिक आक्रमकपणे काम करेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. भाई मोहन गुंड हे चिटणीस मंडळाचे सदस्य असून अत्यांत चिकाटीने जिद्दीने प्रमाणीकपणे काम करणारा चेहरा म्हणुन त्याची मराठवाड्यात ओळख आहे. अनेक शेतकरी कामगाराचे यशस्वी आंदोलने त्यांच्या नावावर आहेत, सक्रीय चळवळीतील अनुभवाचा फायदा पक्ष कार्यकर्त्यांना होईल असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे. मराठवाडा विभागासह राज्यभरातून भाई मोहन गुंड यांचं अभिनंदन करण्यात येत आहे, मात्र पुन्हा शेतकरी कामगार पक्ष मराठवाड्यामध्ये उभा करणे हे त्यांच्या समोरील मोठं आव्हान असणार आहे हे मात्र नक्की.

मे मध्ये मराठवाड्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची तातडीची बैठक आयोजित करण्यात येणार आहे, पूर्ण विभागामध्ये तालुका दौरे करून जुन्या नव्या कार्यकर्त्यांची सांगड घालून प्रत्येक तालुक्यामध्ये कमिटी स्थापन करून, शेतकरी कामगाराच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता प्रत्येक तालुक्यात मराठवाड्यामध्ये शेकापचे कार्यकर्ते अग्रही भूमिका घेऊन प्रश्न सोडवण्यासाठी काम करतील या साठी मी स्वतः लक्ष घालणार आहे प्रत्येक गावात गावात शेकापचे विचार पोहचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केले आहेत.मो ९४२३९७९४९२

------------------

### मुस्लिम समाजाच्या हक्कासाठी १७ एप्रिलच्या एल्गार आरक्षण मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हा - शेख फारुख

खांद्याला खांदा लावून उभे राहण्याची आहे. आपल्या हक्कासाठी शांततेच्या मार्गाने आवाज उठविणे हीच खरी ताकद आहे, असेही त्यांनी सांगितले. १७ एप्रिल रोजी बीड येथे होणारा मुस्लिम एल्गार आरक्षण मोर्चा यशस्वी करून मुस्लिम समाजाची एकजूट राज्याला दाखवून द्यावी, असे आवाहनही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शेख फारुख यांनी शेवटी केले.

------------------

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने बीड नगर परिषदेला आठवली अवदसा

या खडी उधळून त्रास देण्याच्या कार्यामुळे भीम जनतेसह संपूर्ण बीड शहरवासीयांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष पसरला आहे. तसेच महामानवाच्या जयंती निमित्ताने जर रस्ता चांगला करायचाच होता तर निव्वळ खडी ऐवजी डांबर मिश्रित खडी आणि कच टाकून तरी खड्डे बुजवायचे होते. अशी प्रतिक्रिया या निमित्ताने मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिली आहे.

------------------

### शिदोड येथील ४८ व्या नारळी सप्ताहाची भक्तीमय वातावरणात

योगीराज स्वामी महाराज यांनी भगवंताच्या नामस्मरणात रममाण झालेल्या भक्ताला लौकिक व्यवहाराचे भान राहत नाही. आतां कैसी जाऊं घरा, नव्हे बरा लौकिक या ओळींचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, भक्तीमुळे जीवनाला खरा आनंद आणि समाधान प्राप्त होते असे सांगितले. यावेळी पुढे बोलताना

योगीराज महाराजांनी कीर्तनातून केवळ अध्यात्मच नव्हे, तर विविध सामाजिक विषयांवरही मार्गदर्शन केले.आजचा समाज व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकत चालला आहे. संतांचे विचार केवळ ऐकण्यासाठी नसून ते आचरणात आणण्यासाठी आहेत, या जिवघेण्या व्यसनाधीनतेच्या विळख्यातून समाजाला आणि तरुणाला बाहेर काढण्याची ताकद केवळ संतांमध्ये आहे हे अनेक उदाहरणातून समाजाला पटवून देत

त्यांनी व्यसनमुक्त समाज घडवण्याचे आवाहन केले.श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी, असा महत्त्वपूर्ण संदेश देत विवेकपूर्ण भक्तीचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण, शेती आणि संस्कारांचे महत्त्व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.शेतकरी जगला पाहिजे, तरच देश जगेल, असे सांगत त्यांनी शेतीचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच गोसंवर्धन, पर्यावरण संवर्धन आणि स्त्री सन्मान याबाबतही त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

दिग्गज कीर्तनकारांची मांदियाळी

सप्ताहादरम्यान विविध नामवंत कीर्तनकारांनी ज्ञानयज्ञ रंगवला. महंत जनार्दन महाराज, शिवा महाराज बास्कर, निवृत्ती महाराज इंदुरीकर, ज्ञानेश्वर महाराज तांबे, संजय महाराज पाचपोर, जयवंत महाराज बोधले, पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्यासह अनेकांनी हरिनामाचा जागर केला. ह.भ.प. अंकुर महाराज साखरे यांच्या 'संगीत रामकथे'ने भाविकांना मंत्रमुग्ध केले. मान्यवरांची उपस्थिती, ग्रामस्थांचे मोलाचे योगदान या सोहळ्यासाठी गेवराई विधानसभेचे सदस्य आ.विजयसिंह पंडित, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांचे चिरंजीव सौरभ सोनवणे, माजी मंत्री बदामराव आबा पंडित, शिवसेनेचे कुंडलिक बापू खांडे, शामराव अण्णा पडुळे यांच्या सूनबाई पूजाताई पडुळे, माजी जि.प.सदस्य दिलीप गोरे, शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह इतर राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. शिदोडसह परिसरातील हजारो भाविकांनी या सप्ताहात सहभाग घेतला. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंताने दिग्गज अशा विविध कीर्तनकारांनी हरिनामाचा जागर केला. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शिदोडसह परिसरातील हजारो भाविकांनी या सोहळ्यात सहभाग घेतला.

पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... च्या जयघोषात आणि विठ्ठल-रखुमाईच्या नामस्मरणात या नारळी सप्ताहाची भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण सांगता झाली. संतविचार, हरिनाम आणि समाजप्रबोधनाचा संगम घडवणारा हा सप्ताह शिदोडच्या आध्यात्मिक परंपरेला अधिक समृद्ध करणारा ठरला. या कार्यक्रमाचे आभार रंजित बापू कदम यांनी मानले. तर हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी सर्व शिदोड ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील नागरिकांनी परिश्रम घेतले. मागील सात दिवसापासून सुरू असणाऱ्या सप्ताहाच्या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील भाविक भक्त लाखोंच्या संख्येने उपस्थित होते.

------------------

# साबला येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी; मान्यवरांचा विशेष गौरव

केज (आरंभ वृत्तसेवा):- येथील ग्रामपंचायत कार्यालय आणि समस्त गावकऱ्यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि चैतन्यपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'भव्य सत्कार समारंभात' विविध क्षेत्रातील मान्यवरांचा विशेष गौरव करण्यात आला. हा सोहळा शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजता साबला येथील श्रीराम भक्त हनुमान मंदिर परिसरात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी महात्मा फुलेंच्या सामाजिक कार्याचा आणि विचारांचा जागर केला. या विशेष गौरव सोहळ्यात समाजातील विविध स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या खालील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला: डॉ. दिनकर रावसाहेब राऊत,प्रा. विष्णू रानबा सरवदे,कु. ऋतुजा अशोक नाईकनवरे, चि. अविनाश गुलाब काकडे,श्रीमती वैशाली विजय सरवदे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.शांतिनाथ बनसोडे सर



परीक्षा नियंत्रक नांदेड विद्यापीठ व माजी सभापती मा. विष्णुभाऊ घुले उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श शिक्षक श्री सुधीर नाईकनवरे सर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामायणाचार्य लक्ष्मण काकडे यांनी आपल्या मधुर वाणीतून केले. तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आदर्श शिक्षक श्री नरहरी काकडे सर यांनी केले या कार्यक्रमासाठी गावातील आजी माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायत कार्यालय, साबला यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला साबला नगरीतील नागरिक, महिला व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. महात्मा फुलेंचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशी भावना आयोजकांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी उपस्थित उपसरपंच कचराबाई सरवदे,ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ, पोपट काकडे, अशोक काकडे,तसेच काशिनाथ नाईकनवरे,अभिमान नाईकनवरे,श्रीमंत नाईकनवरे,हनुमंत नाईकनवरे,गणेश कटारे, गुलाब मुळे,विश्वनाथ नाईकनवरे,महादेव कटारे,अशोक नाईकनवरे व समस्त गावकऱ्यांच्या सहकार्याने आणि उत्साहाने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# नृत्य-गीतांतून बाबासाहेबांना अभिवादन महेंद्र मुधोळकर यांनी व्यक्त केले मत

बीड (आरंभ वृत्तसेवा):- महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी उत्साहात साजरा होणारा जयभीम महोत्सव हा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत झी २४ तास वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी महेंद्र मुधोळ यांनी व्यक्त केले.

बीड शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. रविवारी (दि.१२) रोजी जयभीम महोत्सवाच्या निमित्ताने भव्य नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अध्यक्ष स्थानावरुन महेंद्र मुधोळकर बोलत होते. यावेळी उदघाटक म्हणून लावणी प्रिन्स शुभम बोराडे, रवी वाघमारे, सुशिलाताई मोराळे आदी उपस्थित होते.भव्य नृत्य स्पर्धेचे प्रमुख अजय सवाई यांच्या नियोजनातून स्पर्धा पार पडली. महेंद्र





मुधोळकर पुढे बोलताना म्हणाले जयभीम महोत्सवातले सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणी ठरत असून, महापुरुषांच्या विचारधारेवर आधारित गीतांद्वारे कवी व गायकांनी सामाजिक जागृतीचा प्रभावी संदेश दिला. तसेच या गीतांवर विविध वयोगटातील कलाकारांनी सादर केलेल्या नृत्यांनी प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवला, असे त्यांनी नमूद केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची गोडी आणि त्यांचे कार्य समजून घेण्यासाठी अशा कार्यक्रमांची नितांत गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. जयंतीपुरते मर्यादित न राहता वर्षभर विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे, विचारांना चालना देणारे आणि सामाजिक भान निर्माण करणारे दर्जेदार उपक्रम आयोजित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशा उपक्रमांमुळे नवीन पिढीला बाबासाहेबांचे विचार अधिक प्रभावीपणे समजतील व ते आचरणात आणण्याची प्रेरणा मिळेल.समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक होण्यासाठी या उपक्रमांचे महत्त्व असल्याचेही महेंद्र मुधोळकर यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धेचे प्रमुख अजय सवाई यांनी केले. सूत्रसंचालन यश सवाई यांनी तर आभार पियुष सवाई यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे योगदान दिले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव;उद्या निघणार भव्यदिव्य मिरवणूक!

आष्टी (आरंभ वृत्तसेवा):- राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सवानिमित्त उद्या १४ एप्रिल रोजी कडा शहरात भव्यदिव्य मिरवणूक निघणार असून या जयंती सोहळ्यास मोठ्या संख्खेने सहभागी होण्याचे आवाहन जयंती उत्सव समितीने केले आहे. आष्टी तालुक्यातील कडा येथे दरवर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव साजरा केला जातो.यावर्षी देखील या



जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.उद्या सायंकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा,तथागत गौतम बुध्द मुर्ती,रमाई व बाबासाहेब यांचा नेत्रदीपक देखावा,संविधान देखावा,अंलकार बॅन्जो आढळगांव,हालगी पथक,सनई वाद्य पथक,पेपर ब्लास्ट हे मिरवणूकीचे मुख्य आकर्षण असणार आहे.या मिरवणूक सोहळ्यास मोठ्या संख्खेने सहभागी होण्याचे आवाहन जयंती उत्सव समितीकडून करण्यात आले आहे.


# गाडगेबाबांच्या विचारांची परंपरा जपणाऱ्या सभेत फुले-जयंती उत्साहात, बारुळकरांना श्रद्धांजली



बीड (आरंभ वृत्तसेवा):- कृतिशील समाजसुधारक, सत्यशोधक धर्माचे संस्थापक आणि शैक्षणिक-सामाजिक क्रांतीचे प्रणेते क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त बीड येथे अभिवादन करण्यात आले. याच वेळी शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचे किर्तन-प्रवचनातून जनप्रबोधन करणारे ह.भ.प. मधुकर महाराज बारुळकर यांच्या अकाली निधनाबद्दलही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

गाडगेबाबांच्या समाजसुधार अभियानाची पताका खांद्यावर घेत चळवळ पुढे नेणारे ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे यांच्या निवासस्थानी आयोजित अभिवादन सभेत विविध मान्यवरांनी उपस्थित राहून आपली श्रद्धांजली अर्पण केली. जेष्ठ शिक्षक नेते व मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक प्राचार्य डी. जी. तांदळे, आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अशोक येडे, प्रबोधनकार ह.भ.प. नितीन महाराज पिसाळ, लेक लाडकी अभियानाचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, पर्यावरणप्रेमी अभिमान खरसाडे, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष गणेश मस्के, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रा. पंजाब येडे तसेच अनेक पदाधिकारी, शिक्षक व प्राध्यापकांनी यावेळी आपापल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार संयोजक ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे यांनी मानले, तर संचालन ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे यांनी केले. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्त्यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा जपत समाजप्रबोधनाची गरज अधोरेखित केली.

# मॅपिंग करून घ्या नसता मतदार यादीतून कायमचे नाव वगळले जाणार :- प्रा. बबनराव आंधळे



बीड (आरंभ वृत्तसेवा):- दिनांक १३ ४ २०२६ बीड जिल्ह्यातील सर्व मतदाराचे मतदार पुनर्नरीक्षण आणि मॅपिंग करण्यासाठी सर्व मतदान केंद्रावर रविवार आणि सोमवार अशा दोन दिवशीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या मोहिमेचा लाभ बीड जिल्ह्यातील सर्व समाजातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार जर मतदारांनी आपले मॅपिंग करून घेतले नाही तर त्यांचे नाव मतदार यादीतून कायमचे वगळले जाण्याची शक्यता आहे नाव वगळले गेल्यास भविष्यात सर्व सवलतीपासून वंचित राहावे लागू शकते म्हणून बीड जिल्ह्यातील सर्व मतदार बंधू आणि भगिनींनी आपले मॅपिंग करून घ्यावे असे आवाहन एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे

# अंकुश नगर येथील युवा कार्यकर्त्यांच्या वतीने महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



बीड (आरंभ वृत्तसेवा):- अंकुश नगर येथील बौद्ध विहारात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती युवा कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने अत्यंत उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. समाजातील तळागाळातील घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या या महापुरुषाला अभिवादन करण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेच्या सामूहिक पूजनाने व पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी युवा कार्यकर्त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध नियोजन करून या अभिवादन सोहळ्याचे आयोजन केले होते. या प्रसंगी जालिंदर माने, बबिता ताई इंगोले, भारत माने, बौद्धाचार्य सोनवणे, दादा कांबळे, ॲड. आदर्श जाधव, अमर माने, आशिष माने, उमेश डोईफोडे, धम्मा डावकर, विशाल डावकर, करण वाघचौरे, यशपाल डावकर यांच्यासह अंकुश नगर मधील सर्व बौद्ध उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या 'सत्यशोधक' विचारांचा जागर करत त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. युवा पिढीने महापुरुषांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून सामाजिक परिवर्तनासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी पुढे यावे, असा सूर या प्रसंगी उमटला. सामूहिक बुद्ध वंदना घेऊन आणि महापुरुषांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. युवा कार्यकर्त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवण्यासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांचे 'सत्यशोधक' विचार हे केवळ पुस्तकात न राहता, आजच्या तरुण पिढीने ते कृतीत आणणे काळाची गरज आहे. अंकुश नगरमधील युवा कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन हा जो अभिवादन सोहळा आयोजित केला, तो याच विचारांच्या वारशाचा एक भाग आहे. युवकांनी संघटित होऊन सामाजिक परिवर्तनासाठी पुढाकार घेणे, हीच महात्मा फुले यांना खरी अभिवादन ठरेल.

(ॲड. आदर्श जाधव)

# वडजाई देवी यात्रेनिमित्त डोईफोडवाडी (ता. बीड) येथे कुस्त्यांची रंगतदार दंगल



केज (आरंभ वृत्तसेवा):- डोईफोडवाडी (ता. बीड) येथे वडजाई देवीच्या यात्रेनिमित्त पारंपरिक कुस्त्यांची भव्य दंगल मोठ्या उत्साहात पार पडली. यात्रेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कुस्ती स्पर्धेला परिसरातील ग्रामस्थ, तरुण मंडळी व कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. या दंगल सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे विजेत्या मल्लाला देण्यात येणारी चांदीची गदा होय. जिल्हा परिषद सदस्य श्री राणा डोईफोडे यांच्या हस्ते ही चांदीची गदा प्रदान करून कुस्त्यांना प्रारंभ करण्यात आला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. कुस्त्यांच्या मैदानात विविध गावांतील नामांकित मल्लांनी आपली ताकद आणि कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मनं जिंकली. प्रत्येक कुस्तीला प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करून दाद दिली. काही लढती अत्यंत चुरशीच्या ठरल्या असून, शेवटपर्यंत निकाल लागेपर्यंत उत्सुकता शिगेला पोहोचली होती. या कार्यक्रमात गावातील मान्यवर तसेच सर्व गावकरी मंडळी आणि तरुणांनी उत्साहाने सहभाग घेतला. यात्रेचे वातावरण भक्तीमय आणि उत्साहपूर्ण होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ, युवक मंडळ व आयोजकांचे विशेष कौतुक करण्यात आले. अशा पारंपरिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# शेतकरी संघटनेचे निवासी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

आष्टी (आरंभ वृत्तसेवा) शेतकरी संघटनेच्या वतीने १६,१७ आणि १८ एप्रिल २०२६ रोजी निवासी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन खेरडा (खु) ता.माजलगांव जि.बीड येथे केले आहे.१०० शिबिरार्थींच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. महिलांचीही स्वतंत्र राहण्याची व्यवस्था केलेली आहे.१६ एप्रिल २०२६ रोजी सर्जक स्वातंत्र्य संघटनेचे प्रमुख अमर हबीब शिबिराचे उदघाटन करून मार्गदर्शन करतील. दुपारच्या जेवणानंतर शेतीमालाचा उत्पादन खर्च कसा काढावा? यासंबंधी माजलगावचे तालुका कृषी अधिकारी गणेश दाभाडे आणि गौरव बापमारे माहिती देतील. शेतीमालाचा रास्त भाव की हमीभाव? यासंबंधी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट मार्गदर्शन करतील.तर शेतकरी संघटनेच्या क्रांतीसिंह नाना पाटील ब्रिगेडचे अध्यक्ष शिवाजी नाना नांदखिले शेतमजुरांच्या समस्येवर आपले मनोगत व्यक्त करतील. प्रत्येक वक्त्यांचे भाषण झाल्यानंतर प्रश्नोत्तरे होतील.रात्रीच्या जेवणानंतर माजलगाव तालुक्यातील कवींचे शेतकरी कवी संमेलन होणार





आहे.१७ एप्रिल २०२६ रोजी शेती अभ्यासक इरफान शेख 'ग्रो प्रोडयूसर कंपन्यांची बाजार व्यवस्था' यावर आपले विचार मांडतील. कृषी मुल्य आयोगाचे माजी सदस्य अच्युत बापू गंगणे 'आम्हीच खरे उद्योजक ' याबाबत भुमिका मांडणार आहेत. 'शेतकरी आंदोलनासमोरिल आव्हाने' यावर शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष लक्ष्मण वडले आपले मनोगत मांडतील.दुपारच्या जेवणानंतर 'रावण राजा राक्षसांचा' या पुस्तकाचे प्रसिद्ध लेखक शरद तांदळे हे बळीराजा कोण होता? याची ऐतिहासिक संदर्भासह माहिती देतील.रात्रीच्या जेवणानंतर अंबाजोगाईचे हेमंत धानोरकर यांचा अंधश्रध्दा निर्मूलनाचा कार्यक्रम होणार आहे.१८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी औरंगाबाद उच्च न्यायालयातील वकील तथा शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ड.अजित काळे शेतकरी विरोधी कायदे याविषयीची माहिती देतील.तसेच २०१७ च्या शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेतील सरकारच्या भुमिकेचे सविस्तर विवेचन करतील.शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा ऊस दर आंदोलनाचे सरसेनापती रघुनाथदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाने शिबिराचा समारोप होणार आहे.तरी परिसरातील शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे.असे आवाहन शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख अजिमोद्दिन, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख रहेमान सय्यद,आष्टी तालुका अध्यक्ष संतोष उर्फ पप्पू गुंड, विष्णू मांढरे उपसरपंच रूईनालकोन यांच्या वतीने करण्यात आले आहे. संपर्क महादेव गायकवाड ९५४५२५९५८२ अण्णासाहेब म्हस्के ९८५०७७९७०२



**आष्टी: येथील पोलीस ठाण्याचे अंमलदार चंद्रमुनी बनसोडे यांची नुकतीच हवालदार पदी पदोन्नती झाल्याने खा.बजरंग बाप्पा सोनवणे यांनी त्याचा सत्कार केला.यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.छाया:शौकत पठाण तागडखेलकर**

**बीड : अंथरवण पिंपरी येथे शांतीचे प्रतीक तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची स्थापना दि.१४*४*२०२६ रोजी मानवतेला शांती, समता आणि करुणेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांच्या भव्य मूर्तीची स्थापना मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात पार पाडण्याचे आयोजन करण्यात आले आहे या सोहळ्यामुळे परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे या प्रसंगी सामाजिक एकात्मतेचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तथागत गौतम बुद्ध यांनी दिलेला करुणा, मैत्री आणि शांततेचा संदेश आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा असून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडण्यास मदत होण्यासाठी ही कल्पना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे**



# सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी रिपाइंचा ईद ए-मिलाफ

बीड (आरंभ वृत्तसेवा):- बीड हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याचे प्रतिक असलेल्या पवित्र रमजान ईदचे औचित्य साधून हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हिंदू-मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी व सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीरगंज चौक बीड येथे रविवार (दि.१२) एप्रिल २०२५ रोजी हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत ईद ए-मिलाफ कार्यक्रम संपन्न झाला. भारताची एकात्मता व देशातील सर्व धर्मीय भाईचारा व बंधुता टिकून ठेवण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य व बंधुताचा संदेश देत भारत एक संघ ठेवण्याचे महान कार्य केले. सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी व हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी गेल्या २० वर्षापासून रिपाइंच्या वतीने केले जात आहे. आगामी काळातही समता, स्वातंत्र्य,बंधुता व एकोपा जोपासण्यासाठी सर्व धर्मीयांना सोबत घेऊन ईद ए-मिलाफच्या माध्यमातून सुरू राहणार आहे. रिपाइंच्या वतीने



युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आयोजित केलेल्या ईद-ए-मिलाफच्या कार्यक्रमास

माजी आ.राजेंद्र जगताप, सिराज देशमुख, सय्यद सलीम, मोईन मास्टर, शेख शफिक भाऊ, झहीर कादरी, सुशीलाताई मोराळे, जावेद कुरेशी, फारूक पटेल, अशोक लोढा,चंद्रकांत नवले, अशोक हिंगे, बाळासाहेब पिंगळे, अश्फाक इनामदार, कामरान शेख, सय्यद आरशियान, आसाराम गायकवाड, प्रा. प्रदिप रोडे, रणजित क्षीरसागर, संदिप उपरे, शुभम धूत, नवनाथ शिराळे, सुहास पाटील, बबन वडमारे, अरुण भोले, अनिल घुमरे, शीतलकुमार सुकाळे, संतोष गायकवाड, डॉ.लक्ष्मण जाधव, संतोष मानूरकर, वसंत मुंडे, वैभव स्वामी, संदिप बेदरे, शेखर कुमार, अमर नाईकवाडे, सचिन चव्हाण, भीमराव दळे, मचिंद्र जोगदंड, भारत कांबळे, अमरेंद्र विद्यागर, सलाम शेठ, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे पान २ वर...

## मुस्लिम समाजाच्या हक्कासाठी १७ एप्रिलच्या एल्गार आरक्षण मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हा – शेख फारुख

बीड (आरंभ वृत्तसेवा):- मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण हा काळाची गरज बनला असून, येणाऱ्या पिढीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी १७ एप्रिल रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या मुस्लिम एल्गार आरक्षण मोर्चात सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शेख फारुख यांनी केले आहे.



यावेळी बोलताना शेख फारुख म्हणाले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक स्वार्थाचा नसून संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय्य हक्कासाठी आहे. शिक्षण, नोकरी आणि विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही समाजाची जुनी व रास्त मागणी आहे. समाजातील अनेक तरुण आजही संधीअभावी मागे राहत आहेत. त्यामुळे आपल्या मुला-बाळांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा लढा आवश्यक आहे. ते पुढे म्हणाले की, आज जर आपण एकजुटीने उभे राहिलो नाही तर येणाऱ्या काळात आपल्या पुढील पिढ्यांना संधींपासून वंचित राहावे लागू शकते. म्हणून प्रत्येक तरुण, ज्येष्ठ नागरिक, महिला व समाजातील सर्व घटकांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून या मोर्चात सहभागी व्हावे. ही वेळ एकत्र येण्याची आहे, मतभेद विसरून समाजहितासाठी पान २ वर...

# अज्ञात व्यक्तीकडून नाळवंडी बस स्थानक परिसरामध्ये महात्मा फुले चौक स्थापन

नाळवंडी (आरंभ वृत्तसेवा)- बीड तालुक्यातील नाळवंडी बस स्थानक परिसरामध्ये १० एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास एका अज्ञात व्यक्तीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा चौक स्थापन केलेला असून याच दुसऱ्या परिसरामध्ये महात्मा फुले बस स्थानक परिसर आशा आशयाचा इलेक्ट्रॉनिक बोर्ड देखील उभा केलेला आहे तर ११ एप्रिल रोजी याच चौकावरती क्रांतीसुर्य ध्वजारोह करून ग्रामस्थांनी फुले जयंती साजरी केलेली आहे.हा चौक उभारल्यानंतर याच गावातील ज्येष्ठ मंडळींनी हा चौक गावच्या गाव पणाला नववळन देणारा ठरेल असेल असे देखील मत व्यक्त केलेले आहे.



बीड तालुक्यातील नाळवंडी या ठिकाणी १० एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास एका अज्ञात व्यक्तीने नाळवंडी बस स्थानकामध्ये महात्मा फुले बस स्थानक इलेक्ट्रॉनिक बोर्ड व फुले चौक या परिसरामध्ये स्थापन केलेला असून याच स्थापन केलेल्या चौकामध्ये ११ एप्रिल रोजी ग्रामस्थांनी क्रांतीसुर्य ध्वजारोहण करून महात्मा फुले जयंती साजरी केलेली होती तर या चौक उभारणीनंतर ज्येष्ठ मंडळींनी हा चौक गावच्या गाव पणाला नववळन देणारा ठरेल असेल असे देखील मत व्यक्त केलेले आहे.

## मुस्लिम आरक्षण मोर्चाला लाखोंच्या संख्येने उपस्थित राहा - नवीद पटेल

बीड (आरंभ वृत्तसेवा): मुस्लिम समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी १७ तारखेला बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून, या मोर्चात लाखोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन युवक नेते नवीद पटेल यांनी केले आहे. मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने आयोजित या मोर्चासाठी जोरदार तयारी सुरू असून, जिल्ह्यात विविध ठिकाणी बैठका, जनजागृती मोहीम व संपर्क अभियान राबविण्यात येत आहे. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून हा मोर्चा यशस्वी करण्याचा प्रयत्न आयोजकांकडून केला जात आहे. नवीद पटेल यांनी सांगितले की, शिक्षण, नोकरी व सामाजिक न्यायासाठी मुस्लिम समाजाला आरक्षण मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे १७ तारखेला होणाऱ्या या मोर्चात युवक, महिला व जेष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. या मोर्चाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला जाणार. असून, मागण्या मान्य न झाल्यास पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. समाजातील सर्व घटकांनी एकजुटीने या भव्य मोर्चात सहभागी होऊन आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा, असे आवाहन नवीद पटेल यांनी केले आहे.



## मराठवाडा विभागात शेकापक्ष विस्ताराची जबाबदारी आता केजचे भाई मोहन गुंड यांच्या खाद्यावर

**अनेक वर्षे चळवळीचा अनुभव प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक चेहरा शेकापने दिला**

केज (आरंभ वृत्तसेवा):- भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा मराठवाडा एकेकाळी बालेकिल्ला होता. मराठवाड्याने शेकापला दिग्गज नेते दिले यामध्ये उस्मानाबादचे विरोधी पक्ष नेते, खासदार स्वातंत्र्य सैनानी भाई उध्दवराव पाटील, माजी खासदार भाई ड. नरसिंगराव काटीकर, परभणीचे आमदार भाई अण्णासाहेब गव्हाणे, नांदेडचे माजी खासदार, आमदार भाई डॉ. केशवराव धोंडगे, अहमदपूरचे माजी मंत्री किसनराव देशमुख, परभणीचे माजी खासदार शेषराव देशमुख, तुळजापूरचे माजी आमदार मानिकराव खपले, परभणीचे भाई लक्ष्मणराव नाना गोळेगावकर, कळंबचे माजी आमदार कुंडलिकराव घोडके , निलंग्याचे माजी आमदार भाई श्रीपतराव साळुंके,औसाचे माजी आमदार भाई मल्लनाथ गुंडनाथआप्पा, कंधारचे माजी आमदार गुरुनाथ कोरडे, गंगाखेडचे माजी आमदार भाई ज्ञानोबा गायकवाड,बीडचे जनार्दन तुपे, परतुरचे भाई माजी बारकुले या नेत्यांसह शेकडोवर आक्रमक झुंजार कार्यकर्त्यांची स्थानिक पातळीवर काम करणारी शेकापची मोठी फळी मराठवाड्यामध्ये होती. अलीकडच्या काळात भांडवली, जातीय गलिच्छ राजकिय समीकरणात चळवळीपासुन तरूण दुरावत गेले, पक्षाचे मराठवाड्यात बोटावर मोजण्याइतकेच लोक पक्षात उरले आहेत. आशा परिस्थितीत प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक आंदोलनातील चेहरा म्हणून ओळख असणारे शेकापचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांच्यावर दौरे करुन बांधणीची जबाबदारी देण्यात आल्यामुळे मराठवाड्यामध्ये कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.



मराठवाडा विभागातील पक्ष संघटन बांधणीसाठी पुर्ण वेळ काम करणारे भाई मोहन गुंड यांच्यावर जबाबदारी द्यावी अशी मागणी अनेक कार्यकर्त्यांची होती, त्या अनुषंगाने पक्षाचे सरचिटणीस मा. आमदार भाई जयंत पाटील यांच्या आदेशान्वये मराठवाडा विभागाची जबाबदारी भाई मोहन गुंड यांच्यावर सोपवण्यात आली असल्याची माहिती पक्षाचे कार्यालयीन चिटणीस भाई ड.राजेंद्र कोरडे यांनी या संदर्भातील पत्र भाई मोहन गुंड यांना दिले आहे. या पत्रानुसार मराठवाडा विभागात पक्षाचा दौरा आयोजित करून ग्राम, तालुका व जिल्हा स्तरावर पक्ष संघटन करणे अपेक्षित आहे, पक्ष विस्तारासाठी समित्यांची स्थापना करणे, पदाधिकाऱ्यांची निवड पान २ वर...

## बीड जिल्ह्यातील मुस्लिम नेते मुस्लिम लोकांवर शिव्या देणाऱ्या मंत्री, तसेच आमदार सोबत आहेत का ? :- शेख युनूस

बीड (आरंभ वृत्तसेवा):- महाराष्ट्रात सध्या मुस्लिम समाजावर मंत्री नितेश राणे, आ. गोपीचंद पडळकर ,संग्राम जगताप, महेश लांडगे हे लोक जातीय तेढ निर्माण करून जेव्हा वाटेल तेव्हा मुस्लिम समाजाला टार्गेट करीत आहे. तसेच मुस्लिमांना जातीय शिवीगाळ करून मज्जिद समोर जाणून बुजून नाचून मुस्लिम समाजाला त्रास देण्याचे काम करीत आहेत. गृहमंत्री तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब,आपण यांना सुपारी दिली का काय? हा जनतेच्या मनात पडलेला प्रश्न आहे.आपण एक राज्याचे मुख्यमंत्री तसेच गृहमंत्री आहात. आपली जबाबदारी आहे की, आपण आपल्या राज्यात काय चाललं याच्याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच जातीय तेढ निर्माण करून महाराष्ट्र पेठविणाऱ्या मंत्री तसेच आमदारांना तंबी दिली पाहिजे.आपणच जर आपल्या मंत्री ला तसेच आमदारांना पाठराखण करीत असाल तर येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला याचे परिणाम भोगावे लागतील. आपल्याकडून मुस्लिम समाजाची खूप अपेक्षा आहेत.




आपण आपल्या मंत्र्यांना आवरा. तसेच बीडच्या पण नेत्यांना माझा सवाल आहे की, आपण त्या मंत्री,आमदार सोबत आहेत की काय? नाहीत ना. मग बीडच्या मुस्लिम समाजाच्या नेत्यांनी एकत्र येऊन मंत्री नितेश राणे, गोपीचंद पडळकर संग्राम, जगताप महेश लांडगे, यांच्यावर गुन्हा दाखल करावा. जिल्ह्यातील सर्व मुस्लिम समाज आपल्या पाठीशी आहे. तुम्ही आवाज द्या .जनता तुमच्या पाठीशी आहे. जर तुमच्या कडून होत नसेल तर मुस्लिम समाजाच्या नेत्यांनी आपापल्या पदाचे राजीनामे द्यावे. आणि घरी बसावे ही जनतेची मागणी आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने बीड नगर परिषदेला आठवली अवदसा

### *राजुरी वेस-बलभीम चौक रस्त्यावर खडीचा मारा; दुचाकी स्वार धडाधड पडू लागले!*

बीड (प्रतिनिधी) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने बीड नगर परिषदेला अवदसा आठवल्याने शहरातील राजुरी वेस-बलभीम चौक रस्त्यावर खडीचा मारा करण्यात आला आहे. या खडीमुळे दुचाकी स्वार धडाधड पडू लागले आहेत. त्यातही महिला वर्गाचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. असे मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी म्हटले आहे. दिनांक १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होत आहे. यानिमित्ताने संपूर्ण बीड शहरावरून ओवाळून फेकलेल्या राजुरी वेस ते बलभीम चौक रस्त्यावर बीड नगरपरिषदेने रात्रीतून खडी चा मारा केला आहे. यामुळे या रस्त्यावरून ये-जा करणारे दुचाकी स्वार धडाधड पडू लागले आहेत. पडणाऱ्यांमध्ये महिला आणि तरुणींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे पाहता बीड नगरपालिका जनतेला त्रास देण्याकरिता कधी कोणते पाऊल उचलेल याचा नेम नसतो, याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. नगरपालिकेच्या पान २ वर...



## शिदोड येथील ४८ व्या नारळी सप्ताहाची भक्तीमय वातावरणात सांगता; व्यसनमुक्त समाज अन् गोसंवर्धनाचा दिला संदेश

बीड (आरंभ वृत्तसेवा):- भक्ती ही केवळ बोलण्याची किंवा प्रदर्शनाची गोष्ट नसून ती अनुभवण्याची गोष्ट आहे. जेव्हा भक्त भगवंताच्या प्रेमात रंगून जातो, तेव्हा संसारातील माया, मोह आणि धनाची आसक्ती आपोआप नाहीशी होते, असे प्रतिपादन श्री क्षेत्र रामगडाचे महंत ह.भ.प. श्री योगीराज स्वामी महाराज यांनी केले. श्री क्षेत्र संस्थान रामगडच्या वतीने शिदोड येथे आयोजित नारळी अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता समारंभात 'काल्याच्या कीर्तनाप्रसंगी' ते बोलत होते. या वेळी संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने आणि भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता. श्री क्षेत्र रायगडाच्या वतीने ४७ वा नारळी सप्ताह बीड तालुक्यातील शिदोड नगरीत मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हरीनें माझें हरीलें चित्त ।
भार वित्त विसरलें ।।१।।
आतां कैसी जाऊं घरा ।
नव्हे बरा लौकिक ।।ध्रु.।।
पारखियांसी सांगतां गोटी ।
घरची कुटी खातील ।।२।।
तुका म्हणे निवांत राहीं ।
पाहिलें पाहीं परतुनी ।।३।।



*भगवंताच्या प्रेमात रंगूतो, तेव्हा संसारातील माया, मोह आणि धनाची आसक्ती आपोआप नाहीशी होते- महंत योगीराज स्वामी महाराज*

या अभंगावर निरूपण करताना श्री महंत श्री हभप योगीराज स्वामी महाराज म्हणाले की, साधक भक्त हरीनामात दंग झाले की घर दार संसार विसरुन जातात. जशा गोकुळातील गौळणी म्हणतात की, भगवंताने माझे चित्त हरण केले, म्हणजे चोरले. त्यामुळे पैसा म्हणजे धन व संसारींक बोजा म्हणजे भार आम्ही विसरुन गेलो आणि आता विसरुन गेल्या मुळे घर च लक्षात न राहील्या मुळे घरी कशी जाऊ ...आता मला लोक काय म्हणतील... लौकीका साठी हे बरे नाही

आणखी तेच मनावर धरुन लोकाबरोबर म्हणजे पारखीयां ना सांगत बसले किंवा गोष्टी करत बसले, तर हातात आलेला देव किंवा परमार्थ निघुन जाईल.

तुकाराम महाराज म्हणतात एकदा मन परमेशवरात लीन झाले तर आपण कुठे जरी असलो तरी पाहीलेले पाहिले की मन परत येते म्हणुन निवांत राहा.

तुकाराम महाराजांच्या अभंगातून आध्यात्मिक उलगडा कीर्तनादरम्यान संत तुकाराम महाराज यांच्याहरीनें माझें हरीलें चित्त, भार वित्त विसरलें...

या अभंगावर महाराजांनी प्रभावी आणि रसाळ निरूपण केले. यावेळी बोलताना महंत श्री पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT